## विश्वास आणि विकासाच्या सूत्रावर भाजपचा महापौर विराजमान - आ.किशोर जोरगेवार

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर संपूर्ण राज्याचा विश्वास आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सर्वसमावेशक आणि गतिमान विकास होत आहे. याच विश्वासाच्या आणि विकासाच्या धर्तीवर आज चंद्रपूर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता स्थापन झाली असून, विश्वास आणि विकासाच्या सूत्रावर भाजपचा महापौर विराजमान झाला असल्याची प्रतिक्रिया आमदार किशोर जोरगेवार यानी व्यक्त केली.
आमदार जोरगेवार म्हणाले की, देशात आणि राज्यात भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे. त्यामुळे चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिकेतही भाजपची सत्ता असणे गरजेचे होते. केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वय असल्यास विकासकामांना गती मिळते, आणि त्याचा थेट फायदा नागरिकांना होतो.
चंद्रपूरच्या विकासाला प्राधान्य देत उबाठा गटातील नगरसेवकांनी व्यापक विचारातून भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दिला आणि भाजपचा महापौर विराजमान केला. उबाठा गटाचे समर्थन शहराच्या भवितव्यासाठी घेतलेला जबाबदार निर्णय असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.नव्या सत्तेच्या माध्यमातून चंद्रपूर शहराचा पायाभूत विकास, नागरी सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या विषयांना प्राधान्य दिले जाईल. चंद्रपूरला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्यासाठी ही महापालिका कटिबद्ध राहील, असा विश्वास आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला.

# चंद्रपुरात भाजप-शिवसेना (उबाठा) चा एकत्रित जल्लोष

## ◆कमळ व मशालचे झेंडे एकत्र फडकले◆आ.जोरगेवारांनी एकमेकांना पेढे भरवले◆आ.मुनगंटीवार 'किंगमेकर' चे पोस्टर झळकले








**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** चंद्रपूर महानगरपालिकेतील सत्तास्थापनेनंतर राजकीय चित्र पूर्णपणे बदलल्याचे दृश्य शहरात पाहायला मिळाले. भाजप आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या परस्परविरोधी मानल्या जाणाऱ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत जल्लोष केला.
या जल्लोषात कमळ आणि मशाल हे दोन्ही पक्षांचे झेंडे एकाच वेळी फडकताना दिसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.महापौरपदी भाजपच्या संगीता खांडेकर यांचा विजय आणि उपमहापौरपदी शिवसेना (उबाठा) चे प्रशांत दानव यांची निवड होताच शहरातील विविध भागात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यकर्त्यांनी फटाके फोडत आणि घोषणाबाजी करत विजयाचा जल्लोष केला. विशेष म्हणजे या जल्लोषात भाजप व शिवसेना (उबाठा) चे नेते आणि कार्यकर्ते एकत्र दिसून आले, ही बाब अनेकांसाठी आश्चर्याची ठरली.
या दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी दोन्ही बाजूंच्या पदाधिकाऱ्यांना एकमेकांना पेढे भरवून शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या भूमिकेमुळे 'स्थानिक विकासासाठी पक्षभेद बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे,' असा संदेश देण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, शहरात ठिकठिकाणी 'युती घडवून आणण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार किंगमेकर' असल्याचे पोस्टर झळकले.
या पोस्टरमुळे या संपूर्ण सत्तास्थापनेमागे आ. सुधीर मुनगंटीवार यांची महत्त्वाची भूमिका असल्याच्या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे. काही ठिकाणी या पोस्टरमुळे राजकीय वादालाही तोंड फुटले आहे. भाजप-शिवसेना (उबाठा) यांचा हा अनपेक्षित एकत्रित जल्लोष महाविकास आघाडीतील समीकरणे बदलणारा ठरत असल्याचे मानले जात आहे. एकीकडे काँग्रेसकडून आघाडी धर्माचा मुद्दा उपस्थित केला जात असताना, दुसरीकडे चंद्रपूरमध्ये मात्र नव्या युतीचा आनंद खुलेआम साजरा होत असल्याचे चित्र आहे.या घडामोडींमुळे चंद्रपूरच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला असून, या स्थानिक युतीचे राज्याच्या राजकारणावर काय पडसाद उमटतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महापौर-उपमहापौर निवडणुकीनंतर वंचितची चंद्रपूर शहर कार्यकारिणी बरखास्त

### महासचिव किसन चव्हाण यांच्या आदेशाने कारवाई ; गैरहजेरीची घेतली दखल

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** चंद्रपूर महानगर पालिकेच्या महापौर व उपमहापौर निवडणुकीदरम्यान वंचित बहुजन आघाडीचे दोन नगरसेवक गैरहजर राहिल्याच्या पार्श्वभूमीवर पक्षाने कठोर भूमिका घेतली आहे. वंचित बहुजन आघाडीचे चंद्रपूर शहर अध्यक्ष स्नेहल रामटेके यांची संपूर्ण शहर कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे. हा निर्णय पक्षाचे महासचिव किसन चव्हाण यांनी आदेशाद्वारे जाहीर केला आहे.महापौर व उपमहापौर निवडणुकीत प्रत्येक मताला विशेष महत्त्व असताना वंचितचे दोन नगरसेवक गैरहजर राहिले. या घटनेमुळे निवडणुकीच्या निकालावर परिणाम झाला असून शहरातील राजकीय समीकरणे बदलली.पक्षाच्या शिस्तीला तडा गेल्याचे कारण देत वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली.
महासचिव किसन चव्हाण यांनी जारी केलेल्या आदेशात पक्षशिस्त, संघटनात्मक नियंत्रण आणि भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.शहर कार्यकारिणी बरखास्त करून नव्याने संघटनात्मक बांधणी करण्यात येणार असल्याचेही संकेत देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक राजकारणात खळबळ उडाली असून, कार्यकर्त्यांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी पक्षशिस्तीसाठी ही कारवाई योग्य असल्याचे मत व्यक्त केले,तर काहींनी अचानक घेतलेल्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.महापौर व उपमहापौर निवडणुकीतील गैरहजेरीमुळे पक्षाची प्रतिमा आणि राजकीय वजन कमी झाल्याचा संदेश या कारवाईतून देण्यात आला असून, आगामी काळात वंचित बहुजन आघाडी चंद्रपूर शहरात संघटन मजबूत करण्यासाठी नव्या रणनीतीसह पुढे जाण्याची शक्यता आहे.

# गैरहजर व तटस्थ नगरसेवकांच्या भूमिकेचा काँग्रेसला फटका

## शिवसेना (उबाठा)च्या भूमिकेने चित्र पालटले, महाविकास आघाडीतील घटक पक्ष असतानाही काँग्रेस राहिली बेसावध

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर निवडणुकीत काँग्रेसला अनपेक्षित आणि धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला. वंचित बहुजन आघाडीचे दोन नगरसेवक गैरहजर राहणे आणि एमआयएमच्या एका नगरसेवकाने तटस्थ भूमिका घेणे, यासोबतच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने भाजपला दिलेला पाठिंबा, या तिन्ही घटकांनी मिळून काँग्रेसच्या पराभवाची पायाभरणी केली.
शिवसेना (उबाठा) हा महाविकास आघाडीचा घटक पक्ष असल्याने काँग्रेसने स्वाभाविकपणे त्यांच्या पाठिंब्यावर विश्वास ठेवला होता. मात्र ऐन निवडणुकीच्या वेळी शिवसेना (उबाठा) ने भाजपला पाठिंबा दिल्याने काँग्रेस पूर्णपणे बेसावध ठरली. या राजकीय उलथापालथीमुळे महानगरपालिकेतील सत्तासमीकरण क्षणात बदलले.महापौर पदासाठी झालेल्या मतदानात भाजपच्या संगीता खांडेकर यांना ३२ मते मिळाली, तर काँग्रेसच्या वैशाली महाडोळे यांना ३१ मते मिळाली. एका मताच्या फरकाने काँग्रेसचा पराभव झाला. निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे दोन नगरसेवक गैरहजर राहिले, तर एमआयएमच्या एका नगरसेवकाने तटस्थ भूमिका घेतल्याने काँग्रेसची मतसंख्या वाढू शकली नाही.उपमहापौर पदाच्या निवडणुकीत शिवसेना (उबाठा) समर्थित प्रशांत दानव आणि जनविकास सेनेचे उमेदवार पप्पू देशमुख यांना समान ३२-३२ मते मिळाली. समान मतांमुळे ईश्वर चिठ्ठी पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या प्रक्रियेत प्रशांत दानव यांच्या नावाची चिठ्ठी निघाल्याने ते उपमहापौरपदी विजयी ठरले.
या निवडणुकीच्या निकालामुळे चंद्रपूरच्या स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. महाविकास आघाडीतील समन्वयाचा अभाव, गैरहजेरी आणि तटस्थ भूमिकांचा फटका थेट काँग्रेसला बसला. दुसरीकडे, शिवसेना (उबाठा) व भाजप यांची अनपेक्षित जवळीक चर्चेचा विषय ठरत असून, येणाऱ्या काळात या नव्या समीकरणांचा महानगरपालिकेच्या कारभारावर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिवसेना (ठाकरे) ची भाजपाला साथ ; काँग्रेस आक्रमक

### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा निर्वाणीचा इशारा, दिल्ली दरबारी तातडीची दखल

चंद्रपूर महानगरपालिकेतील सत्तास्थापनेदरम्यान शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने भाजपाला दिलेल्या पाठिंब्यामुळे महाविकास आघाडीमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटत असून, काँग्रेसने शिवसेना (उबाठा) वर आघाडी धर्म पाळला नसल्याचा गंभीर आरोप केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत निर्वाणीचा इशारा दिला आहे.चंद्रपूरमध्ये महापौर निवडणुकीदरम्यान शिवसेना (उबाठा) ने थेट भाजपच्या उमेदवाराला पाठिंबा दिल्याने काँग्रेसला सत्तेपासून दूर राहावे लागले. ही भूमिका महाविकास आघाडीच्या एकत्रित धोरणाच्या विरोधात असल्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात येत आहे. या घटनेनंतर काँग्रेस नेत्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, आघाडीतील समन्वयावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना पक्षाच्या हायकमान्डने तातडीने दिल्लीला बोलावले असल्याची माहिती समोर येत आहे. चंद्रपूरमधील घडामोडी, शिवसेना (उबाठा) ची भूमिका आणि त्याचा राज्यातील आघाडी राजकारणावर होणारा परिणाम, यावर सविस्तर चर्चा होण्याची शक्यता आहे. दिल्लीतील बैठकीनंतर काँग्रेसची पुढील रणनीती ठरणार असल्याचे संकेत आहेत.दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांनी चंद्रपूरच्या सत्तास्थापनेसाठी घोडेबाजार झाल्याचा थेट आरोप केला आहे. 'लोकशाही मूल्यांना तडा जाणाऱ्या पद्धतीने सत्ता मिळवण्यासाठी आर्थिक व राजकीय व्यवहार झाले,' असा गंभीर आरोप त्यांनी केला. या प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी सूचक शब्दांत केली आहे.शिवसेना (उबाठा)ने आघाडी धर्म पाळला नसल्याचा मुद्दा राज्यभर चर्चेचा विषय ठरत असून, अनेक काँग्रेस नेत्यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. महाविकास आघाडीतील विश्वासाचे नाते धोक्यात आल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.चंद्रपूरच्या स्थानिक सत्तास्थापनेतून सुरू झालेला हा वाद आता थेट राज्य व दिल्ली दरबारी पोहोचला असून, येत्या काळात महाविकास आघाडीच्या राजकारणाला कोणती दिशा मिळते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## प्रज्वल प्रफुलराव वडेट्टीवार यांना पीएचडी पदवी



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी फरवरी २०२६ रोजी जाहिर केलेल्या अधिकृत अधीसुचनेनुसार तुकूम, चंद्रपूर येथील डॉ. खत्री महाविद्यालय संशोधन केंद्रातील अर्थशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थीनी कु. प्रज्वल प्रफुलराव वडेट्टीवार यांना 'Cashless transaction and its impact on rural economy of Eastern Vidarbha' या विषयावर पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.
सदर संशोधन कार्य डॉ. जे. एम. काकडे, प्राचार्य व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर यांच्या मार्गदर्शनात पूर्ण करण्यात आले. संशाधनामध्ये पूर्व विदर्भातील ग्रामीण भागातील रोखविरहीत व्यवहार पध्दतीचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, शेतकरी, लघुउद्योजक व सर्वसामान्य नागरीकावर परिणाम यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक वृंद व कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिलेल्या आहेत.

## नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे ओळखपत्र निःशुल्कच

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) जिल्हा कामगार सुविधा केंद्र तसेच तालुका कामगार सुविधा केंद्रामार्फत निःशुल्क वितरीत करण्यात येते. परंतु काही व्यक्ती दलालांमार्फत पैसे घेऊन बनावटी ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) दिले जात असल्याच्या तोंडी तक्रारी प्राप्त होत आहेत. करीता कोणत्याही बांधकाम कामगारांनी सदरील व्यक्ती /दलाला मार्फत बनावटी ओळखपत्र न घेता जिल्हा कामगार सुविधा केंद्र तसेच तालुका कामगार सुविधा केंद्रातून आपले ओळखपत्र (स्माट कार्ड) घ्यावे.सदर ओळखपत्र (स्मार्ट कार्ड) हे निःशुल्क असल्याने कोणाही व्यक्तीस /एजेंट यांना पैसे देऊ नये. तसेच पैशांची मागणी करणाऱ्या संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, असे आवाहान सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय यांनी केले आहे.

## १८ फेब्रुवारी रोजी 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रम

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा (राज्यमंत्री दर्जा) रुपाली चाकणकर ह्या १८ फेब्रुवारी २०२६ रोजी चंद्रपूर जिल्हा दौऱ्यावर येत असून १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन कार्यालय, चंद्रपूर येथे महिलांच्या समस्येकारिता 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जनसुनावणी घेणार आहे.

# मुंबई येथे बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार समारोह संपन्न

## चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विशेष योगदान



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** कुष्ठरुग्ण, आदिवासी आणि उपेक्षितांच्या आयुष्यात 'आनंदवन' फुलविणारे व भारत जोडो हा नारा देणारे थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून श्रद्धेय बाबा आमटे एकता अभियान ट्रस्ट द्वारा मुंबई येथील यशवंतराव चव्हाण केंद्रात दि.९ फेब्रुवारी २०२६ ला बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार समारोह संपन्न झाला. या पुरस्कार समारोहास चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विशेष सहकार्य लाभले.या सोहळयात अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संपादिका सरिता कौशिक, उद्‌घाटक स्थानी ज्येष्ठ संपादक व विचारवंत माजी खासदार कुमार केतकर, मानवाधिकार कार्यकर्ते व प्रख्यात अधिवक्ता असीम सरोदे, सत्कारमूर्ती ओ. पी. शहा, माधव बावगे, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे आदी उपस्थित होते.
या पुरस्कार समारोहात कलकत्ता येथील क्नीट इंडिया सायकल मार्च, १९८९ चे वरिष्ठ समन्वयक व सेंटर फॉर पीस अँड प्रोग्रेसचे (शांतता व प्रगती केंद्र) संस्थापक ओ. पी. शहा यांना २०२६ चा बाबा आमटे जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार स्वरूपात एक लाख रुपये रोख रक्कम व सन्मान पत्र प्रदान करण्यात आले. तर लातूर येथील अनिस (अंधश्रद्धा निर्मूलन समिती) तथा भारत जोडो सायकल यात्रेचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांना २०२६ चा बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार स्वरुपात पन्नास हजार रुपये रोख व सन्मान पत्र देण्यात आले.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे विचार व्यक्त केले. बाबा आमटे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.सत्कारमूर्तीच्या कार्याची ओळख करून देण्यात आली. जिल्हा बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे यांचाही सत्कार करण्यात आला.
अध्यक्ष स्थानावरून सरिता कौशिक यांनी रविंद्र शिंदे यांच्या कार्याचा गौरव केला.बाबा आमटे एकता अभियान ट्रस्टचे कोषाध्यक्ष व भारत जोडो सायकल मार्चचे गिरीष पदमावर, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, उपाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा बँकेचे संचालक तथा माजी आमदार सुदर्शन निमकर, आवेश खान पठाण, जयंत टेमुर्डे, रोहित बोम्मावार, दिनेश चोखारे, गणेश तळवेकर, विजय बावणे, निशिकांत बोरकर यांचेसह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## हत्तीरोग सार्वत्रिक औषधोपचार मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्‌घाटन

**युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी**
**चंद्रपूर दि.१० :** जिल्ह्यात हत्तीरोग दूरीकरण करण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्‌घाटन मुल तालुक्यातील चिरोली येथे झाले.यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, गटविकास अधिकारी किशोर शिंदे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रकाश साठे, राज्य कार्यक्रम अधिकारी डॉ. मिथीलेश सिंग, डॉ. शिरिषा पटेल, जिल्हा पर्यवेक्षक सुनिल जोशी, मनिभूषण धनवान, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, चिरोली येथील मुख्याध्यापक परमानंद सेलोकर, जिल्हा समन्वयक महेश झरकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामेश्वर बावणे, तालुका पर्यवेक्षक महादेव जांभुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सौरभ कन्नाके उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी हत्तीरोग निर्मूलनासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहिमेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. तसेच सर्व मान्यवरांनी शालेय विद्यार्थ्यांसमोर स्वतः एमडीए-आयडीए औषध सेवन करून मोहिमेबाबत विश्वास निर्माण केला.

# ग्रामगीता महाविद्यालय चिमूरचे रासेयो शिबिर संपन्न

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**
**चिमूर दि.१० :** सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळ, गडचिरोली द्वारा संचालित ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजा मालेवाडा येथे आयोजित सात दिवसीय रासेयो शिबिराची सांगता नुकतीच उत्साहात पार पडली. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा एस. आस्वले यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.




समारोपीय कार्यक्रमाला माझी प्राचार्य डॉ. अमीर धमानी आणि व्हॉइस ऑफ मीडिया चंद्रपूर, सरचिटणीस श्रीहरी सातपुते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.त्यांनी शिबिरार्थीना मार्गदर्शन करताना रासेयो शिबिरासाठी निवड झालेल्या स्वयंसेवकांना भाग्यशाली संबोधले. रासेयो शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर जे संस्कार होतात, ते आयुष्याच्या जडणघडणीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. तसेच शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात सकारात्मक बदल झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते, असे मत त्यांनी व्यक्त केले.
या समारोपीय कार्यक्रमास मालेवाडा ग्रामपंचायतीचे सरपंच कालिदासजी भोयर, उपसरपंच शंकर दडमल, मुख्याध्यापक गुलाब पंधरे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रवीण जीवतोडे, शा.व्य.स. चे अध्यक्ष आशिक रामटेके, गु.से.मं.चे चरणदास पोइनकर, ग्रामसेवक राजेश कांबळे, पोलीस पाटील हेमंत गजभिये आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी शिबिरार्थीना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. हूमेश्वर आनंदे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी समाजाचे ऋण परतफेड करण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणजे रासेयो शिबिर असून प्रत्येक भारतीयाचे समाजाविषयी दायित्व आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना या शिबिरातून झाल्याचे नमूद केले. देशप्रेमाची भावना स्वयंसेवकांमध्ये निर्माण होणे हेच या रासेयो शिबिराचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले.
समारोपीय कार्यक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. बिजनकुमार शिल यांनी सात दिवसीय शिबिराचा सविस्तर अहवाल सादर केला. या समारोपीय कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे 'माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी' या वृद् वाक्याला सार्थक करणारे गावातील तीन व्यक्तिमत्त्व, कालिदासजी भोयर, आशिक रामटेके आणि चरणदासी पोइनकर यांना महाविद्यालयाच्या वतीने शॉल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. मालेवाडा येथे पार पडलेल्या या रासेयो शिबिरात प्राणायाम, ध्यान व योगासने, ग्राम स्वच्छता, जलसंवर्धन रॅली, रक्तदान शिबिर, आपत्ती पूर्वतयारी व व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, पशुचिकित्सा शिबिर, मानव-वन्यजीव संघर्ष, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आरोग्य शिबिर, संविधान सन्मान रॅली, सकारात्मक दृष्टिकोन व मानवी विकास, सामुदायिक प्रार्थना तसेच विविध सांस्कृतिक व बौद्धिक कार्यक्रम राबविण्यात आले.
समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. स्वयंसेविका कु. संगीता चौधरी, सूत्रसंचालन रा.से.यो. स्वयंसेविका कु. प्राची मंगर, तर आभार प्रदर्शन रा.से.यो. स्वयंसेविका कु.अश्लेषा चन्ने यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, प्रशासकीय कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
युवाराष्ट्र दर्शन

# यवतमाळ

३

बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६

जिल्हा

## 3 रुग्णांवर हायड्रोसिल शस्त्रक्रिया यशस्वी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ**

जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम तसेच हत्तीरोग दुरीकरण मोहिमेअंतर्गत 7 फेब्रुवारी रोजी ग्रामीण रुग्णालय वणी येथे हायड्रोसिल अर्थात अंडवृद्धी तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या 3 रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. हे शिबीर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तसेच जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. टी. ए. शेख यांच्या सूचनेनुसार मोहिमेला गती देण्यात आली.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

# डेप्युटेशन बदलण्याचे ऑन द स्पॉट निर्देश

### आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने यवतमाळात आश्रमशाळा शिक्षक-कर्मचा-यांच्या समस्या निवारण सभा

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. १० फेब्रुवारी**

जिल्ह्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत आश्रमशाळा शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने समस्या निवारण सभा सहाय्यक संचालक यांचे दालन, इ.मा.ब. कल्याण, यवतमाळ येथे २१ जानेवारी २०२६ रोजी पार पडली.

या सभेला शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच कामचुकार कर्मचाऱ्यांवर ऑन द स्पॉट कारवाई करण्याचे आदेश देखील आमदार सुधाकर अडबाले यांनी



वरिष्ठ अधिकारी यांना दिले. या सभेत आमदार सुधाकर अडबाले यांनी भविष्य निर्वाह निधी पथकातील अमोल ठाकरे यांनी केलेल्या कामात दिरंगाईबाबत त्यांचे डेप्युटेशन बदलण्याचे 'ऑन द स्पॉट' निर्देश दिले.

सुरुवातीला विभागांतर्गत आश्रमशाळा शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित विषयांवर सभा घेण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये आश्रमशाळाचे वेतन १ तारखेला नियमित होणेबाबत, १०-२०-३० ची आ.प्र. योजना लाभ प्रकरणे, एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता, 22/12/25 च्या सुधारित पत्रकानुसार थकबाकीबाबत आठ दिवसाच्या आत कॅम्प लावण्यास यावेळी अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. तसेच वरिष्ठ वेतन श्रेणी, २००५ नंतर नियुक्त डिसिपीएस मयत शिक्षकांना निवृत्तीवेतन लाभ, डिसिपीएस शिक्षकांच्या एन.पी.एस. योजना लागू करण्याबाबत, अपघात विमा योजना प्रलंबित प्रकरणे आठ दिवसात निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले. अर्जित रजा रोखीकरण लाभ, अनुकंपा प्रस्तावाबाबत कार्यवाही तसेच वरिष्ठ/निवड श्रेणीचे २४ प्राप्त प्रस्ताव निकाली असून कोणतेही प्रलंबित नसल्याचे सांगितले.

वैद्यकीय, निवृत्ती वेतन, अनुकंपा नोकरी, विमा कवच रक्कम त्वरित अदा न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचे निर्देश यावेळी आमदार सुधाकर अडबाले यांनी दिले.याबाबत सविस्तर कर्मचारी - अधिकारी यांच्याशी आमदार अडबाले यांनी चर्चा केली. सोबतच आश्रम शाळा व विद्यार्थी टिकवण्यासाठी शिक्षकांना मेहनत घेण्याची गरज असल्याचे यावेळी सांगितले.

सदर सभेला सहाय्यक इ.मा.ब. क. यवतमाळचे संचालक ओमप्रकाश नगराळे, अधिकारी गट (ब) मेहरूण सिकंदर शेख, गजेंद्र राऊत, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, महाराष्ट्र आश्रम शाळा राज्य सरचिटणीस किशन पुंड, विजाभज आश्रम शाळा प्रमुख किशोर नगराळे, विमाशि संघाचे वर्धा जिल्हा कार्यवाह महेंद्र सालंकार, यवतमाळ जिल्हाध्यक्ष पवन बन, जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जीवतोडे, कडू, पवार, मुनेश्वर तसेच समस्याग्रस्त आश्रम शाळा शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# भीषण अपघात: ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**•युवाराष्ट्र दर्शन, तालुका प्रतिनिधि घाटंजी, दि. १० फेब्रुवारी**



घाटंजी तालुक्यातील चिखलवर्धा ते कुर्ली रोडवर अपघाताचे सत्र सूरुच असून आज दुपारी दोन वाजताच्या सुमारास एक भिषण अपघात घडला. यामधे एका भरधाव ट्रकने दुचाकीला जोरात धडक दिली या अपघातात सायफळ येथील रमेश चिल्लावार यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात केल्यावर ट्रक चालक मदतीसाठी न थांबता ट्रकसह घटनास्थळावरून वेगातच पसार झाला आहे.

महाराष्ट्र तेलंगाना जोडणारा घाटंजी चिखलवर्धा मार्ग हा अवैद्य वाहतूकदारास सोयीचा मार्ग असल्याने या मागनिच सध्या मोठ्या वाहनांची वर्दळ चालते. या मार्गावर वनविभाग मरगळ अवस्थेतील चेकपोष्ट सोडले तर कुठलेही टोलनाका, चेकींग पोस्ट नसल्याने अदीलाबाद ते चिखलवर्धा, कुर्ली,पारवा मार्गे हा अवैध वाहतूकदारास सूकर मार्ग आहे. हा मार्ग ग्रामीण भाग असल्याने रस्ता अरुंद (सिंगल रोड) आहे. यातून या मार्गावरून सध्या मोठ्या ट्रकची ये-जा वाढली आहे.आज रमेश चिल्लावार रा. सायफळ हे आपले काम आटोपून परत आपल्या दुचाकीने जात असताना समोरून येणाऱ्या भरदाव ट्रकने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच अंत झाला. अपघात घडताच ट्रक चालकाने गाड़ी न थांबवता सुसाट पळ काढला. सदर घटनेची माहिती पारवा पोलिस स्टेशनला देण्यात आली असून वृत्त लिहेपर्यंत मृतकाचे शव हे शवविच्छेदनासाठी घाटंजीत ग्रामिक रुग्णालय येथे पाठविण्यात आले होते. या घटनेतील पसार ट्रक चालकाचा शोध पारवा पोलिस करत आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावर ट्रक चालक अतिशय वेगाने गाड्या चालवतात. रस्ता लहान असूनही ट्रकच्या वेगावर कोणाचेही नियंत्रण नाही. याआधिही या मार्गावरच पारवा जवळ एका सैनिकाचा अपघाती मृत्यू झाला तर कीरकोळ अपघात हे नित्याचेच घडत आहे.

# मजीप्राने सर्व कामे जलदगतीने पुर्ण करा : आमदार बाळासाहेब मांगुळकर

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. १० फेब्रुवारी**

जीवन प्राधिकरण कार्यालयात आज शहरातील विविध नागरी समस्यांबाबत एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शहरवासीयांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांवर सविस्तर आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान गटार लाईनच्या समस्यांमुळे नागरिकांना होणारा त्रास, गढूळ पाणीपुरवठा, ठिकठिकाणी फुटलेल्या पाईपलाईन तसेच अनेक दिवसांपासून रखडलेली विकासकामे याबाबत लक्ष वेधण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांना ही सर्व कामे तात्काळ हाती घेऊन जलद गतीने



पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.या बैठकीला कार्यकारी अभियंता प्रफुल व्यवहारे, उपअभियंता उमक, अभियंता कांबळे तसेच वैशालीताई सवाई कॉंग्रेस पक्षाच्या गटनेत्या, बबलू देशमुख शहराध्यक्ष, कॉंग्रेस कमिटी, प्रमोद बगाडे युवक कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते दिगांबर पजगाडे यांच्यासह नगरसेवक विशाल पावडे, सपना लंगोटे, वैशाली उईके, करुणा तेलंग, अमृता तिवारी, मोहम्मद शाकीर, चांद मोहम्मद, नईम पहलवान, विक्की राऊत, अमन निर्बाण, राजेंद्र गौतम, ओम तिवारी, शुभम कोडापे, नंदू कुडमेथे, अनुप नैताम, रवी शंभरकर, रितू गटलेवार व छोटूभाऊ सवाई हे उपस्थित होते.

# न. प. बांधकाम अभियंत्याचे खाबुगिरी धोरण

### सिमेंट रस्त्याला तीन महिन्यातच पडल्या भेगा

**•युवाराष्ट्र दर्शन तालूका प्रतिनिधी दिग्रस, दि. १० फेब्रुवारी**

शहरात नुकत्याच नगर पालिकेच्या निवडणुका पार पडल्या असून त्यापूर्वी प्रशासक राज असतांना बुटले कॉलेज समोर तीन महिन्यांपूर्वी सिमेंट रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदाराकडून करण्यात आले होते. मात्र निकृष्ट साहित्याचा वापर केल्यामुळे सदर रस्त्याला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे रस्त्याची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट दर्जाची स्पष्टपणे दिसून येत आहे. यामध्ये प्रामुख्याने न. प. बांधकाम अभियंत्याचे खाबुगिरी



धोरण जबाबदार असल्याचे दिसून येत आहे. तसेच शहरात आज रोजी अनेक प्रभाग मध्ये सिमेंट नाली बांधकाम, सिमेंट रस्ते बांधकाम, रपट्याची कामे सुरु असून अनेक कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याची ओरड नागरिक करीत आहे. कुठलेही कामे सुरु होण्यापूर्वी जनतेच्या माहिती करिता फलक लावणे बंधनकारक आहे. काम कोणत्या निधी मधील आहे. किती रुपयांचे आहे. देखभाल दुरुस्ती किती वर्षे याबाबत जनतेस माहिती असणे गरजेचे आहे. असा त्यामागील उद्देश आहे.परंतु तीन महिने होऊनही बुटले कॉलेज समोरील रस्त्यावर फलक मात्र लावलेले नाही. शिवाय रस्त्याचे कडेला मुरूमची भरीव सुद्धा दिली गेली नाही.दिग्रस मधील विकास कामात अभियंता व कंत्राटदारांची मनमानी सुरु असल्याचे बोलल्या जात आहे.

**CHANGE OF NAME**

OLD NAME AS PER PASSPORT BEFORE
MARRIAGE: **POOJA ASHOK GHODMARE**
NEW NAME AS PER AADHAR CARD, PAN CARD
AFTER MARRIAGE: **AYESHA FATIMA RAHEMAN NIRBAN**
ADDRESS: SHINDE NAGAR, MILIND SOCIETY,
YAVATMAL 445001

**CHANGE OF NAME**

OLD NAME AS PER PASSPORT:
**RAHEMAN RAJAK NIRBAN**
NEW NAME AS PER AADHAR CARD, PAN CARD:
**RAHEMAN RAJJAK NIRBAN**
ADDRESS: SHINDE NAGAR, MILIND SOCIETY,
YAVATMAL 445001

# युसूफसेठ पुंजानी यांची कार्यकर्त्याच्या घरी सदिच्छा भेट

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी आर्णी, दि. १० फेब्रुवारी**

महाराष्ट्रात एमआयएम पक्षाने महानगर पालिका व नगर पालिका निवडणुकीत जोरदार मुसंडी मारली त्या नंतर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष युसुफ सेठ पुंजानी यांनी आर्णी येथे येत बाबा कंबलपोष दर्शन घेऊन ज्या कार्यकर्त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत एमआयएम पक्षासाठी काम केले त्या निष्ठावंत कार्यकर्त्याच्या घरी सदिच्छा भेट देऊन कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवले येत्या काळात त्या सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांना पक्ष न्याय देईल असे या भेटीत सांगितले.आगामी काळात पक्ष प्रमुख असुद्दीन ओवेसी व प्रदेश प्रमुख माजी खासदार इम्तियाज जलील याच्या नेतृत्वात आर्णी येथे शेकडो महत्वाचे कार्यकर्ते पक्षात प्रवेश घेऊन पक्ष बळकट करतील अशा प्रकारे नियोजन करण्यात येणार असल्याचे कळते.



एम.आय.एम.चे प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसुफ सेठ पुंजानी यांचा आर्णी दौरा विविध सामाजिक संघटनांना सदीच्छाभेट, आर्णीतील राजकारणात मोठे उलटफेर होणार एम.आय.एम. चे प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसुफ सेठ पुंजानी यांचा आर्णी दौरा रविवार दि. ८ फेब्रवारी ला अत्यंत उत्साहाने पार पडला. सायंकाळी ७ वाजता विज वितरण कार्यालयापासून शेकडो कार्यकर्त्यांच्या बाईक रॅलीने या दौऱ्याची सुरुवात झाली. मेन रोड-शिवनेरी चौक ते मुबारक नगर असे मार्गक्रमण करीत निघालेल्या रॅलीचे मुबारक नगर येथील हजरत टिपु सुलतान यांच्या प्रतिमेजवळ फटाक्यांच्या अतिषबाजीसह जंगी स्वागत करण्यात आले. हजरत टिपु सलतान यांच्या प्रतिमेला हार अर्पन करुन युसुफसेठ पुंजानी यांनी एम. आय. एम. पदाधिकारी अली खान यांच्या निवासस्थानी भेट दिली व उपस्थित शेकडो एम.आय.एम कार्यकत्यांना मार्गदर्शन केले. तेथुन विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व मान्यवरांना सदीच्छा भेट देण्यासाठी पत्रकार इमरान मन्नान बेग मिर्झा यांच्या घरी ते रवाना झाले. त्या ठिकाणी हाजी युसुफ सेठ पुंजानी यांचे सह एम.आय.एम. जिल्हाध्यक्ष सलीमजी सांगवान, एम.आय.एम. पदाधिकारी समशेर लाला, फैजान लाला तसेच कारंजा नगर परिषदेचे नगरसेवक यांचा आर्णी नगर परिषदेचे आरोग्य सभापती अनवर पठाण, माजी उपनगराध्यक्ष कादर इसाणी, माजी नगरसेवक यासीन नागाणी, इसराईल उर्फ (कालिया) शेख, युनुस शेख, संजयजी वाघमारे, अनिस शेख, जुनेद शेख, कादर डोसाणी, पत्रकार बाधंव तसेच या इलाही हैदरी ग्रुपचे सर्व सदस्य यांचे मार्फत सत्कार करण्यात आला. या सर्व कार्यक्रमासाठी एम.आय.एम.चे युवा शहर अध्यक्ष आरीफ खान, गजनवी शेख, सुफी रिजवान, अली खान, साजीद शेख, मोहसिन शेख, मतीन खान, शाहरुख नागानी, जावेद शाह, अल्ताफ कुरेशी, हुजैफा शेख, शेख वसीम, शाहीद खान, अयुब शेख, साबीर सुफी, मुबशीर खान, सलाहुद्दीन, सोहेल चव्हाण व असंख्य एम. आय. एम. कार्यकत्यांनी मेहनत घेतली.

## जाहीर नोटीस

**विषय : जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) मध्ये जन्म नोंद मिळविणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, एमआरसी ८१/७१/२०२६/२०२४ अन्वये **श्री./सौ. निता सत्यभान भूरे रा. सावंगी** यांनी **निता सत्यभान भूरे रा. सावंगी** यांची जन्मनोंद मिळविणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये जाहीर नोटीस सादर करीत आहे.

**तहसीलदार**

क्रमांक/म/सहा. प्रस्तु-3/कावि/165/2025
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 15/12/2025

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, **अर्जदार शेख अकिल शेख नुर** रा.ढाणकी ता.उमरखेड जि.यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की,त्यांची मुलगी नामे **नगमाबी शेख अकील** जन्म **दि. 19/06/1999** रोजी मौजा ढाणकी येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्मनोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.12.2025 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/ हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

क्रमांक/म सहा प्रस्तु-3/कावि /156/2025
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 15/12/2025

## जाहीरनामा

र्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शेख अकिल शेख नुर** ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की,त्यांची मुलगी नामे **रेशमा बेगम शेअकील. जन्म दि.20/03/1987** रोजी मौजा ढाणकी येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्मनोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.12.2025 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप हरकतो अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

क्रमांक म सहा प्रस्तु- कावि/159/ 2025
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 15/12/2025

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, **अर्जदार शेख अकिल शेख नुर** रा.ढाणकी ता.उमरखेड जि.यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की,त्यांची मुलगी नामे **सलमा बी शेख अकील** जन्म दि. 05/07/1996 रोजी मौजा ढाणकी येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्मनोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/ हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.12.2025 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप / हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# भीमायाक देवांचा आंघोळीचा व समाज प्रबोधन कार्यक्रम

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. ८ फेब्रुवारी**

भव्य सामूहिक भीमायाक देवांचा आंघोळीचा व समाज प्रबोधन कार्यक्रम दिनांक 9 फेब्रुवारी रोजी केळापूर घाट येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उदघाटक राहुल आत्राम अध्यक्ष क्रां. शामा दादा कोलाम संघटना, कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम, प्रमुख उस्थिती अरविंद आत्राम सरपंच, दादाराव ढोबळे सरपंच,गजू मेश्राम उपसरपंच, कैलास आत्राम उपसरपच,इसतरावं आत्राम जिल्हा अध्यक्ष चंद्रपूर ,



मार्गदर्शक उद्धव टेकाम,गणेश आत्राम सुरेश मुंडाले, गंगाधर आत्राम, किशोर आत्राम, संजय आत्राम गजानन आत्राम, हरिभाऊ रामपुरे अक्षय आत्राम, बाबुलाल मेश्राम, प्रवीण टेकाम, प्रमुख अतिथी डॉ. भगवान टेकाम, सुमित्रा टेकाम अध्यक्ष, जोस्ना आत्राम सचिव कैलास आत्राम, पांडुरंग टेकाम सुनील टेकाम दिपक आत्राम काशिनाथ टेकाम,बहुसंख्य आदिवासी समाज उपस्थित होता.मान्यवरांचे हस्ते देवांचे क्रां. शामा दादा कोलाम यांच्या फोटोचे पूजन करून कार्यक्रमाला सुरवात केली. आदिवासी सर्व समाज केळापूर घाटावर देव पारंपरिक पद्धतीने आंघोळीसाठी आणतात पुजा अर्चना करतात हा उत्सव शिवरात्री महिन्यात दर सोमवारी घाटावर देवाला आंघोळीसाठी नेतात यात खूप मोठ्या प्रमाणात भीमायक देव आले होते. सदर घाटावर खूप मोठ्या प्रमाणात लोक येतात परंतु देवा सोबत येणाऱ्या लोकांना अडचणीचा सामना करावा लागतो इथल्या अडचणी अध्यक्ष राहुल आत्राम यांनी आमदार तोडसाम यांच्या समोर मांडल्या यातील काही अडचणी टप्पा टप्याने सोडवू असे आश्वासन प्रा. राजूभाउ तोडसाम यांनी दिले.आदिवासी समाजाने आपले समाज प्रबोधन नंतर मान्यवरांनी सर्व देवांच्या भेट घेऊन दर्शन घेतले कार्यक्रचे आभार कैलास आत्राम यानी मानले व अध्यक्ष यांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता केली.

क्रमांक/म/सहा. प्रस्तु-3/कावि/162/2025
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 15/12/2025

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, **अर्जदार शेख अकिल शेख नुर** रा.ढाणकी ता.उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की,त्यांची मुलगी नामे **आसमा बी शेख अकील जन्म दि.24/10/1990** रोजी मौजा ढाणकी येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्मनोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.12.2025 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप / हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-3/कावि / 151/2025
तहसिलदार उमरखेड यांचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 15/12/2025

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **शे.अकील शे.नुर** रा.ढाणकी ता.उमरखेड जि. यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की,त्यांची मुलगी नामे **नाजिमा परवीन शे.अकील** जन्म दि. 03/09/1995 रोजी मौजा ढाणकी येथे झाला आहे.अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्मनोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप / हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 30.12.2025 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा/-**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# घरासमोर उभी असलेली कार गेली चोरीला

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. १०**

घरासमोर उभी कार चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना गोपुरी चौकात उघडकीस आली, शनिवारी सकाळी ही बाब लक्षात आली, यावेळी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरट्यांची हालचाल कैद झाली आहे, सुरज तेलरांधे यांनी रात्री एम. एच. ३२, ए. एच. ११८८ क्रमांकाची कार मोकळ्या जागेत उभी केली, सकाळी कार दिसून न आल्याने त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता मध्यरात्री २.४५ ते ३.३५ वाजता चोर कार चोरी करताना स्पष्ट दिसून आले, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला, तसेच मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजही तपासले, त्यामध्ये धुनिवाले मठ चौकातून ही कार बसस्थानकाच्या दिशेने जाताना दिसून आली, गेल्या काही दिवसांपासून शहर व परिसरात कार व मोठया वाहनांच्या चोरीच्या घटनात वाढ झाली आहे, नुकतेच पोलिसांनी एका परप्रांतीय चोरट्यांच्या टोळीला ताब्यात घेतले होते.

# वर्ध्यातील ४६ विद्यार्थी विमानाने इसराकडे झेपावणार

## पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून नाविन्यपूर्ण शैक्षणिक दौरा

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि.१०**

जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ४६ गुणवंत विद्यार्थ्यांची बंगलोर येथील 'इसरो' (घ्ध्ृ) आणि कुप्पम (आंध्र प्रदेश) येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक दौऱ्याच्या पूर्वतयारीसाठी 'डाएट' येथे पालक आणि विद्यार्थ्यांची विशेष बैठक पार पडली. विमानाने होणाऱ्या या पहिल्याच शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही आनंदाचे वातावरण आहे.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक संस्था पाहायला मिळाव्यात आणि त्यांच्यातील शास्त्रज्ञ जागा व्हावा, या उद्देशाने पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून ही सहल होत आहे.

पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विशेष पाठपुराव्यामुळे या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी निधी उपलब्ध झाला असून, सहलीचे संपूर्ण नियोजन अत्यंत उच्च दर्जाचे करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील मुलांनी विमानाने प्रवास करून अवकाश संशोधनाचे धडे गिरवावेत, हा पालकमंत्र्यांचा मानस या उपक्रमातून पूर्ण होत आहे.डाएटमध्ये आयोजित बैठकीत प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे यांनी पालक आणि विद्यार्थ्यांना प्रवासाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दिनांक १५ ते १९ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात ४६ विद्यार्थी, ४ अधिकारी आणि १ वैद्यकीय अधिकारी असा ५१ जणांचा चमू सहभागी होणार आहे. बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मोबाईल फोन न बाळगणे, ओळखपत्र सतत जवळ ठेवणे, विमानातील प्रवासाचे नियम आणि 'इसरो' भेटीदरम्यान पाळायची शिस्त याबाबत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.

### १५ फेब्रुवारीला विद्यार्थ्यांचे पथक रवाना होणार

प्रवासाचा असा आहे कार्यक्रम : १५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता वर्धा येथून नागपूर विमानतळाकडे प्रस्थान. दि.१६ ते १८ फेब्रुवारी इसरो (घ्ध्ृ) केंद्र भेट, शास्त्रज्ञांशी संवाद आणि कुप्पम येथील वैज्ञानिक प्रकल्प पाहणी. दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:४० वाजता बेंगलोर ते नागपूर असा परतीचा विमान प्रवास.पालकांनी या उपक्रमाबद्दल पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत, असे जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.मंगेश घोगरे यांनी कळविले आहे.

# एटीएम समोरुन दुचाकी लंपास

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. १०**

मजुरीचे काम करुन उदरनिर्वाह करणारा व्यक्ती एटीएममध्ये रोख काढण्यासाठी गेला असता त्याची दुचाकी अज्ञात चोरटयाने चोरून नेली, ही घटना तक्रारीनंतर रविवारी उघडकीस आली, किशोर तुळशीराम वाघेला यांची एम. एच. ३२, ए. आर. ९०८८ क्रमांकाची दुचाकी अज्ञाताने चोरून नेल्याने त्यांचे ५० हजारांचे नुकसान झाले आहे, याप्रकरणी तक्रारीवरुन वर्धा शहर पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# रासेयो म्हणजे समाजसेवेची आवड निर्माण करणारी चळवळ : प्रफुल लोखंडे

## स्वच्छ ग्राम सुंदर ग्राम व पाणी संवर्धनासाठी बंधारा उभारला



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**देवळी,दि. १०**

आजच्या मोबाईल व यूट्यूब च्या युगात सामाजिक कार्यामध्ये तरुण-तरुणींना पाहिजे तेवढा रस नाही. समाजाचा आपण एक भाग आहोत ही कल्पना संपुष्टात आल्यास समाज सेवेकडे कोणीही वळणार नाही म्हणून महाविद्यालय स्तरावर समाजसेवा प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ज्यातून सामाजिक बांधिलकी विकसित होते आणि या दृष्टिकोनातून राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे समाजसेवाची आवड निर्माण करणारी चळवळ होय, असे प्रतिपादन गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे यांनी केले.

रत्नापूर येथे सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुनिता सोनारे तर प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी प्रफुल लोखंडे, वर्धेचे गट विकास अधिकारी समर्थ शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक अश्विन गजभिये, सरपंच सुधीर बोबडे, उपसरपंच सौरभ कडू, चंदा तडस, प्रतिभा कन्नाके, विशाखा आखले, रूपाली राऊत, वैशाली कवडकर, प्रा डॉ रफिक शेख, ग्रामपंचायत सदस्य देविदास वाघ, अयुब अली , ग्रामपंचायत अधिकारी अंकिता इसळ, पोलीस पाटील दीपिका वाघमारे, प्रा. मेघा फासगे, संतोष तुरक, गणेश शेंडे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अंडर ऑफिसर कोमल शितळे व समीक्षा नेवारे यांनी केले तर आभार ग्रामपंचायत अधिकारी यांनी मानले. यशस्वीतेकरिता सुजल पराते, सौरभ साव, यामिनी पारधी, आरती मरगडे, स्नेहा मडकाम, पायल चौके, कुंदन कावडे, पंकज पवार, तेजस वाघाडे, भूषण ठोके, सोमेश्वर पोराटे, विपुल पेंदाम, साहिल जगनाडे, साहिल गेडाम, साक्षी परिसे, पूर्वा कापटे, व रा.से.यो. स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतीय है या प्रेरणा गीताने झाली.

# वीशैव सेवा मंडळाच्यावतीने महाशिवरात्री उत्सव

**वर्धा :** वीरशैव सेवा मंडळाच्यावतीने दि.१५ ते १६ रोजी महाशिवरात्री उत्सवानिमित्त विविध



धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये रविवार दि. १५ रोजी सकाळी ७ ते १० अभिषेक अजिंक्य पहुरकर व इतर, सकाळी १० ते १२.३० गणपती अर्थवशिर्ष रामनगर, दुपारी ३ ते ४ महिलांचे भजन वीरशैव महिला मंडळ, दुपारी ४ ते ६ ओम नम: शिवाय जप वीरशैव महिला मंडळ, अध्यक्ष महिला मंडळ अरुणा बाजारे , सायंकाळी खंजरी भजन संजय तिळले पेन्टर आणि संच, सोमवार, १६ रोजी सकाळी ७ ते १० लघुरुद्राभिषेक अजिंक्य पहूरकर व इतर, सकाळी १० ते १ गोपाल काला संत तुकाराम भजन मंडळ, रामनगर, दुपारी १ ते ४ महाप्रसाद सौजन्य, वीरशैव सेवा मंडळ सादर करणार आहे. महाप्रसादाकरिता रंगाप्पा कुबडे, नारायण बिचेवार, प्रशांत तेले, सुधाकर कापसे, मनोज मरडवार, रविंद्र बाळापुरे, बसंत मरडवार, रविंद्र बाळापुरे, गणपत गुजरकर, ओंकारआप्पा मरडवार, वैशाली गंजीवाले करीत आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन वीरशैव सेवा मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# लाडेगाव जि.प.प्राथमिक शाळेत सांस्कृतिक महोत्सव



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी दि. १०**

प्रतिनिधी. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लाडेगाव येथे सांस्कृतिक कार्यक्रम नुकताच पार पडला असून कार्यक्रमाच्या अध्यक्षा शा.व्य.स.अध्यक्षा वैशाली बोरवार,उद्घाटक माजी सरपंच देवेंद्र बोके तर प्रमुख अतिथी म्हणून रणजीत बोरवार,विश्वास सावरकर,माजी.ग्राप सदस्य गजबे, ग्रामसेविका राऊत उपस्थित होते.

सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्येप्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना मेडल देऊन गौरविण्यात आले. या सांस्कृतिक महोत्सवात शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य, कोळी नृत्य, गोंडी नृत्य, लोककलेवर आधारित भारुड, नाट्यछटा, नाटिका अशा सर्व विविध कलागुणांचे दर्जेदार असे सादरीकरण करून मुलांनी गावातील प्रेक्षकांची मने जिंकली.यावेळी अंगणवाडीच्या चिमुकल्यांनी सुद्धा दर्जेदार असा कलाविष्कार सादर केला.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माजी सरपंच देवेंद्र बोके, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले. व गावातील ज्येष्ठ व श्रेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मनिषा ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन निलेश मानेकर आणि पूजा मडावी यांनी केले. आभार वैशाली बोरवार यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्यगण व पालक वर्ग तसेच सर्व ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# परोपकारी आचरण सुखी जीवनाची गुरूकिल्ली -अग्रवाल



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि. १०**

क्रोध व अहंकार हे माणसाचे खरे शत्रु आहे, क्रोध व अहंकारामुळे माणसाला विवेकाचा विसर पडतो, आपण असा आचरण करु नये, ज्यामुळे दुसऱ्यांना दु:ख किंवा त्रास होईल, सृष्टीकर्ता देवानी आपल्या महान कुशलतेद्वारे असे दुर्लभ शक्तीशाली मानव शरीर आणि सर्व प्राण्यापेक्षा सर्वोत्तम बुद्धी प्रदान केली आहे, देवानी दिलेल्या अमुल्य शरीर आणि बुद्धीचे सदुपयोग करुन सच्चे सुख प्राप्त करणे हे आपल्या हाती आहे, जीवन जगणे ही एक कला आहे, जी आपल्याला श्रीमद भागवत कथेतून शिकायला मिळते, सामाजिक सेवा ही एक ईश्वर सेवा आहे, व्यक्तीचा मोठेपणा त्याचे धनसंपत्ती किंवा पदावरुन ओळखण्यापेक्षा त्याचे अहंकाररहित वागणुकी वरुन ठरत असते, आपले परोपकारी आचरण हे सुखी जिवनाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाज सेवक मोहन अग्रवाल, यांनी केले.

मगन वाडी चौक स्थित श्री संत गजानन महाराज मंदिरमध्ये श्री चे १४८ चे प्रगट दिनाप्रित्यर्थ आयोजित श्रीद भागवत कथा सप्ताहाचे समारोप प्रसंगी ते बोलत होते, यावेळी झांश्री महामंडलेश्वर मंजुलता देवीजी देवस्थानचे सचिव ज्ञानेश्वर पहाडे, कोषाध्यक्ष सुशील व्यास, ट्रस्टी मधुसूदन अग्रवाल, ब्रम्हकुमारी वर्धा सेंटर इंचार्ज माधुरी दीदी आदी मांचावर उपस्थित होते.

यावेळी ब्रम्हकुमारी माधुरी दिदी म्हणाल्या की, यशस्वी होण्याकरिता दुस-याचे दोष काढण्याची दृष्टी सोडून गुणग्राहकतेची दृष्टी ठेवली पाहिजे, दुसऱ्याच्या कामाची प्रशंसा केली पाहिजे, दुस-याला नेहमी सन्मानाने वागविले पाहिजे, जीवनात आनंद व शांती प्राप्त करण्याकरिता अध्यात्माचा मार्ग अवलंब केला पाहिजे, कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर पहाडे यांनी केले, या प्रसंगी मंदिर ट्रस्ट तर्फे भागवताचार्य महामंडलेश्वर मंजुलतादेवी आणि माधुरी दिदी यांचा शाल, श्रीफळ पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला, आरती झाल्यावर प्रसाद वितरीत करण्यात आला, कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बाबाराव फाले, अजय लांबट, महेश राठी, संजय कावळे, अरविंद पाल, किशोर दौड, सुरेश मुंजेवार, पुष्पा आष्टनकर, अर्चना लांबट, रेख अमृतकर, कल्पना पोकळे, सुनील गावंडे, विजय बोबडे, अंबादास तळवेकर, अशोक फुलमाळी, पुष्पा भडंग, आाश तेलंग, राजेंद्र धनुष्कर, श्याम व्यास, राजू कानेटकर, आदिंनी सहकार्य केले. श्रींचा प्रगटदिन असल्यामुळे हजारो भाविक भक्तांनी दर्शना करिता गर्दी केली होती.

# नाचणगाव येथे असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

**वर्धा :** राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग विशेष तपासणी मोहीम १ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत राबविण्यात येत असून प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगाव अंतर्गत उपकेंद्र शिवाजी कॉलनी, गुंजखेडा, दहेगाव, हिंदुस्तान कॉलनी येथे कार्यक्रम पार पडला, या कार्यक्रमांतर्गत ३० वर्षावरील नागरिकांची उच्च रक्तदाब व मधुमेह विशेष तपासणी करण्यात आली, प्रत्येक गावात, वॉर्डात जनजागृती करुन शिबिराचे आयोजन करण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले. जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. मंगेश रेवतकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोनाली मामीलवार यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम राबविण्यात येत आहे, नाचणगाव केंद्र व उपकेंद्र येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद झाडे, डॉ. आदिती लांबट, आरोग्य सहाय्यक दिलीप उटाणे, श्याम जोशी, सिंधू रोकडे, स्वाती धोंगडे यांच्या उपस्थितीत शिबिर घेण्यात आले, प्रसंगी उपस्थितांनी मार्गदर्शन केले. यशस्वीतेकरिता डॉ. कांचन बाभुळकर, प्रिया डोईफोडे, संजय पिंपळकर, सामुदायिक आरोग्य अधिकारी प्राचू अवथरे, माया पडधान, तृप्ती दारूंडे, नेहाल इंगळे, सामुदायिक आरोग्य अधिकारी स्वाती बडगे, आरोग्य सेविका वनिता गजाम, प्रसाद माळवे आदिंनी सहकार्य केले.

# जमिन अधिग्रहणाकरिता नागरिकांनी केला विरोध

## आमदार समीर कुणावार आक्रमक : 'जनसुनावणी शिवाय एक इंचही जमीन देणार नाही

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट ,दि. १०**

रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गाच्या विस्तारीकरणासाठी हिंगणघाट शहरातील रहिवासी भागातील जमीन अधिग्रहित करण्याबाबत केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाकडून राजपत्र प्रसिद्ध होताच शहरात तीव्र असंतोष पसरला आहे. कोणतीही जनसुनावणी न घेता आणि स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता ही प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोप होत असून, याविरोधात आमदार समीर कुणावार यांनी रोखठोक भूमिका घेतली आहे.



या संभाव्य अधिग्रहणामुळे अब्दुल्ला नगर, मारोती वार्ड, संत गोमाजी वार्ड, पुखराज कॉलनीसह रेल्वे मार्गालगतच्या शेकडो घरांवर संकटाचे सावट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार कुणावार यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय कार्यालयात रेल्वे व महसूल प्रशासनाची महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीस उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे, किशोर दिघे तसेच रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत आमदार कुणावार यांनी अधिकाऱ्यांना थेट जाब विचारत सांगितले की, हे पाकिस्तान नाही. लोकांच्या भावनांशी खेळू नका. जनसुनावणीशिवाय जमीन अधिग्रहण मान्य नाही. सर्व्हे क्रमांक २०२, २०६, २०८ व इतर भागांतील नागरिकांची सुनावणी का झाली नाही, याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.प्रत्यक्ष प्रकल्प मार्किंग होऊन किती घरे बाधित होणार आहेत हे स्पष्ट झाल्याशिवाय पुढील कोणतीही कार्यवाही करू नये, तसेच शहरी भागासाठी मोबदल्याचा फॅक्टर १ नुसार नियम लागू होतो की नाही, याची तपासणी करण्याचे निर्देश आमदारांनी दिले. चौथ्या रेल्वे लाईनसाठी पुरेशी जागा उपलब्ध असताना रहिवासी वस्तीत अधिग्रहण कशासाठी, असा प्रश्न करत त्यांनी थेट नागपूर येथील डीआरएम यांच्याशी संपर्क साधला.मालधक्क्यासाठी जागा आवश्यक असल्यास तो शहराबाहेर किमान दोन किलोमीटर अंतरावर हलवावा, अन्यथा नगर परिषद व नागरिक कधीही परवानगी देणार नाहीत, असा स्पष्ट इशाराही आमदार कुणावार यांनी दिला. आमदारांच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासनाने तूर्तास ही प्रक्रिया स्थगित करत बाधित नागरिकांशी स्वतंत्र बैठक घेऊनच पुढील निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

> आम्ही विकासाच्या विरोधात नाही. पण घराघरांवर बुलडोझर चालवून होणारा विकास मान्य नाही. कोणत्याही नागरिकाचे नुकसान होऊ देणार नाही.
> **आमदार समीर कुणावार**



# सिलेंडरचा भीषण स्फोट; घराची राखरांगोळी

## सुदैवाने जीवितहानी टळली,वडाळा येथील घटना

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी (श),दि. १०**

तालुक्यातील अप्पर वर्धा धरणाच्या काठावर वसलेल्या वडाळा गावात मंगळवारी (दि. ९) सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास घरगुती गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन घरातील वस्तूंची राखरांगोळी झाली असून घर पूर्णतः उद्ध्वस्त झाले. या दुर्घटनेत घरमालक शांता भाऊराव भिवापूरे थोडक्यात बचावल्या असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

वडाळा गावातील अंगणवाडी परिसरात असलेल्या शांता भिवापूरे यांच्या घरात स्वयंपाकासाठी लावलेला गॅस सिलेंडर अचानक फुटला. स्फोट इतका तीव्र होता की घरावरील छत हवेत उडाले, भिंती कोसळल्या आणि काही क्षणांतच घराची अक्षरशः राखरांगोळी झाली. सुदैवाने स्फोटाच्या वेळी शांताबाई शेजारी बसायला गेल्या होत्या. त्या घरात असत्या तर अनर्थ ओढवला असता, अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली.

सायंकाळच्या शांततेत अचानक झालेल्या प्रचंड स्फोटाने संपूर्ण गाव हादरले. आगीचे लोळ आणि आकाशात पसरलेला काळा धूर पाहून शेतात काम करणारे शेतकरी धावत घटनास्थळी पोहोचले. गावकऱ्यांनी एकत्र येत आग आटोक्यात आणली. घटनेची माहिती तातडीने आष्टी पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

विशेष म्हणजे स्फोट झालेल्या घराच्या शेजारीच अंगणवाडी आहे. स्फोटाची वेळ थोडी पुढे किंवा अंगणवाडी सुरू असती, तर मोठी दुर्घटना घडली असती. दैव बलवत्तर म्हणून मोठी दुर्घटना टळली. या दुर्घटनेत शांता भिवापूरे यांचे घरातील सर्व संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे. दोन वेळच्या जेवणाचा आणि निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

